जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 SEP 2018
तरूण भारत



कोल्हापूर : केआयटीचे संचालक डॉ. विलास विजय कार्जिन्नी यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे डॉ. महेश चव्हाण आदी.

# गुणवत्ता शिष्यवृत्तीत 'केआयटी' प्रथम

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इजिनिअरींग (स्वायत्त), कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती–२०१८ मध्ये ग्रामिण व्यवसायिक गटामध्ये अभियांत्रिकी विभागात प्रथम क्रमांक पटकाविला.

शिवाजी विद्यापीठात झालेल्या समारंभात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते केआयटीचे संचालक डॉ. विलास कार्जिन्नी व अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले. गेल्या १० वर्षापासून केआयटी हे पारितोषिक सलग पटकाविते आहे. या पारितोषिकाने केआयटीमध्ये दिले जाणारे शिक्षण व गुणवत्ता अधोरेखित झाली आहे.

**दहा वर्षापासून सलग पारितोषिक**

केआयटीने नॅक 'ए' मानांकन, तिनवेळा एनबीए मानांकन, विद्यापीठाची संलग्नता तसेच स्वायत्त दर्जा प्राप्त केला आहे. या यशामुळे विद्यार्थी व पालकांतून कौतुक होत आहे. या यशाबद्दल चेअरमन भरत पाटील, व्हाईस चेअरमन सुनील कुलकर्णी, सचिव दिपक चौगुले यांच्यासह सर्व विश्वस्तांनी अभिनंदन केले.

# केआयटी महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये केआयटी प्रथम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** केआयटी महाविद्यालयामध्ये गुणवत्ता आहे. पारितोषिकाने केआयटीमधे दिले जाणारे शिक्षण व गुणवत्ता अधोरेखित झाले आहे, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

ते कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इजिनिअरिंगला शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१८ मध्ये ग्रामीण व्यवसायिक गटात अभियांत्रिकी विभागात प्रथम क्रमांक मिळाला. त्याच्या वितरण कार्यक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठमध्ये बोलत होते.



**कोल्हापूर : केआयटीचे संचालक डॉ. विलास विजय कार्जिन्नी, अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करताना कुलगुरू देवानंद शिंदे, विलास नांदवडेकर, डी. आर. मोरे.** (छाया : एस. अली)

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, गेल्या दहापेक्षा जास्त वर्षांपासून सलग हे पारितोषिक केआयटी मिळवत आहे. पुढील काळात संशोधन प्रकल्पावर आणखी भर द्यावा लागेल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांची माहिती द्यावी लागेल. महाविद्यालयातील प्राचार्यांनी आणि सर्व प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रेरित करावे.

या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते केआयटीचे संचालक डॉ. विलास विजय कार्जिन्नी आणि अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

केआयटीने नॅक ए मानांकन, तीन वेळा एनबीए मानांकन, विद्यापीठाची संलग्नता, स्वायत्त दर्जा प्राप्त केला आहे. गेल्या १० पेक्षा जास्त वर्षांपासून केआयटी हे पारितोषिक सलगपणे पटकावत आहे. या यशाबद्दल केआटीचे चेअरमन भरत पाटील, व्हा. चेअरमन सुनील कुलकर्णी, सचिव दीपक चौगुले यांच्यासह विश्वस्त यांनी केआयटीचे अभिनंदन केले.

# महाविद्यालये ही संस्कार केंद्रे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विवेकी विचारांची महाविद्यालये उत्तम प्रकारची संस्कार केंद्रे आहेत. प्राचार्यांनी व्यापक दृष्टीने हे संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्यास महाविद्यालय, संस्थेप्रति विद्यार्थ्यांत आदरभाव निर्माण होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात झाला. प्राचार्यांच्या सत्कारप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, हा समारंभ म्हणजे महाविद्यालयांच्या यशाचे, प्रगतीचे आणि त्यांच्या क्षमतेचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांच्या जडण-घडणीसाठी त्यांनी मिळविलेले यश महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांची दृष्टी बदलल्यास मानवतेचा विकास होण्यास साहाय्यभूत ठरते. स्पर्धेच्या जगात तोंड देण्यासाठी शिक्षण हे उत्तम प्रकारचे साधन आहे.

विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या क्षमता वृद्धिंगत करीत राहायला हवे. त्याचबरोबर संशोधन, व्यवस्थापन आणि कौशल्ये आत्मसात करावीत. आजच्या युगामध्ये इंटरनेट हे महत्त्वाचे विकासाचे साधन म्हणून पुढे येत आहे. त्याचा शिक्षणासाठी योग्य वापर करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले. पारितोषिक विजेत्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी मनोगत व्यक्त केले.

कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र या पाच विद्याशाखांमधील सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या शहरी, निमशहरी व ग्रामीण या गटातून सर्व प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी उपस्थित होते.



**कोल्हापूर : प्राचार्यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर.**